Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

९/२०२१

**विषय - कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनाची कडक अंलबजावणी करणेबाबत**

**संदर्भ - मा. जिल्हादंडाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र.कार्या-१२नै.आ./कोरोना/आरआर/३५/२०२१ दि.१९/०२/२०२१**

सर्व संबधितांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणू (कोवीड-१९) चा प्रार्दुभाव पुन्हा वाढत असलेने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मा. जिल्हादंडाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी उपरोक्त संदर्भीय आदेशानुसार कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करणे करिता सोबत प्रमाणे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सर्वांनी सोबत नमूद केलेल्या सर्व उपाय योजना व त्याच प्रमाणे शासनाकडून व विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्गमित करणेत आलेल्या मार्गदर्शक सुचानांची अमंलबजावणी काटेकोरपणे करून कोरोना संसर्गाचा प्रार्दुभाव वाढणार नाही याची खबरदारी घ्यावी.

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**जा.क्र. आस्थापना/** 680
**दि.** 23 FEB 2021
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) सुरक्षा विभाग - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

---

1202 FEB 2021

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2654812 टोल फ्री (1077)
Email: rdckop@gmail.com

सत्यमेव जयते

क्र.कार्या-१२ नै.आ./कोरोना/आरआर/३५/२०२१, दिनांक :- १९/०२/२०२१.

वाचले :-

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १४४.
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीच्या अधिसुचना.
६. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
७. इकडील कार्यालयाकडील जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/९२८/२०२१, दिनांक २९/०१/२०२१ रोजीचा आदेश.
८. दिनांक १६/०२/२०२१ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे दिलेले निर्देश.
९. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील क्र.कार्या.१/सा.प्र.१/आरआर/२१५/२०२१, दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे परिपत्रक.
१०.मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. कोरोना-२०२०/सीआर नं. ८५/एए-५, दि. १७/०२/२०२१ रोजीचे पत्र.

---

**विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रार्दुभाव दुसरी लाट रोखण्यासाठी एकत्रित प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत आदेश.**

## -: आदेश :-

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, इकडील वाचले क्र. ७ अन्वये कोल्हापूर जिल्ह्यातील लॉकडाऊनची मुदत दिनांक २८/०२/२०२१ रोजी रात्री १२.०० वा. पर्यंत वाढविणेत आलेली आहे.

ज्याअर्थी, वाचले क्र. 8 अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे सद्यस्थितीत सर्वत्र कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रार्दुभाव पुन्हा वाढत असलेने आवश्यक ती सर्व खबरदारी तातडीने घेणेबाबतचे निर्देश देवून त्यांची कडक अंमलबजावणी करणेबाबत सूचित केलेले आहे. त्यानुसार वाचले क्र. ९ अन्वये मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील परिपत्रकान्वये सुचना दिलेल्या आहेत. तसेच वाचले क्र. १० अन्वये मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी देखील सुचना दिलेल्या आहेत.

शासनाकडून पुनश्च प्रारंभ अभियांन अंतर्गत प्रतिबंधीत क्षेत्राच्या बाहेरील विविध ठिकाणचे निर्बंध शिथिल करणेबाबत व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठवणे बाबत मानक कार्यप्रणाली / मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करणेच्या अटीस अधिन राहून परवानगी देणेबाबतचे आदेश पारित करणेत आलेले आहेत. परंतू सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकिय कार्यक्रमामध्ये तसेच आठवडे बझार, शाळा कॉलेज, मॉल्स, करमणुकीच्या ठिकाणी व इतर सार्वजनिक ठिकाणी सदर बाबींचे काटेकोरपणे पालन केले जात नसलेचे दिसून येत आहे. त्यासअनुसरून कोल्हापूर जिल्हयामध्ये कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणेबाबत सुचित करणेत आलेले आहे.

Scanned by CamScanner

**अ) मास्कचा वापर करणे** - सर्व नागरिकांनी कोणत्याही कारणासाठी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वावरताना तीन पदरी मास्क किंवा साधा कापडी मास्क किंवा रुमाल किंवा कापडाने नाक व तोंड झाकून वावरणे बंधनकारक करणेत आलेले आहे. व्यापारी दुकाने, खाजगी व शासकीय आस्थापना, मॉल्स, फेरीवाले, भाजी – फळे विक्रेते, कारखाने, प्रवासी वाहने, ऑटो रिक्षा इत्यादी ठिकाणी **' मास्क नाही – प्रवेश नाही ' ' सामाजिक अंतर नसेल तर वितरणही नाही '** यांची कडक अंमलबजावणी सर्व आस्थापना मालक, ग्राहक व नागरिकांनी यांनी करावी. तसेच सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थ खाण्यास व थूंकण्यास परवानगी असणार नाही, असे निर्देशित करणेत आलेले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी संयुक्त पणे वरील निर्देशांचे पालन सर्व नागरिक, सर्व शासकिय व खाजगी आस्थापना यांचेकडून काटेकोर पणे होत असलेबाबतची खात्री करणे तसेच उल्लंघन झालेचे निदर्शनास आल्यास त्याबाबत दंडात्मक कारवाई करणेबाबत अलहिदा निर्देशित करणेत आलेले आहे.

**ब) सामाजिक अंतर राखणे** - सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना, शासकिय अधिकारी, कर्मचारी व इतर सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी बैठकीसाठी अथवा इतर कोणत्याही कायदेशीर कारणासाठी एकत्र येताना परस्परात वैद्यकियदृष्ट्या निर्धारित केलेले सामाजिक अंतराचा निकष कटाक्षाने पाळणे बंधनकारक करणेत आलेले आहे.

**क) सॅनिटायझरचा वापर करणे व स्वच्छता राखणे** - सर्व शासकिय व खाजगी आस्थापनांनी त्यांचे प्रवेशद्वार व आवार याठिकाणी सॅनिटायझर डिस्पेन्सर उपलब्ध करुन ठेवणेबाबत तसेच सर्व जागांची प्रभावी व वारंवार स्वच्छता व निर्जंतुकीकरण करणेबाबत शासनाकडून व इकडील कार्यालयाकडून वेळोवेळी निर्देश देणेत आलेले आहेत.

तथापी कोल्हापूर जिल्ह्यात सद्यस्थितीत कोरोना विषाणु (कोविड-१९) बाधित रुग्णांची संख्या वाढत असलेचे माझे निदर्शनास येत आहे. त्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा भाग म्हणून सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना मास्कचा वापर करणे, शारिरिक व सामाजिक अंतर राखणे व सॅनिटायझरचा वापर करणे यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अधिका -अधिक खबरदारी घेणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची कडक अंमलबजावणीव्दारे कोरोना विषाणु प्रादुर्भाव कमी करणे आवश्यक असलेची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर मला प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन, कोल्हापूर जिल्ह्यात यापुर्वी दिलेल्या आदेशांची / सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे करिता खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१) बंदिस्त सभागृहात होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, अंत्यविधी / अंत्ययात्रा यासाठी मानक कार्यप्रणाली / मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करणेच्या अटीस अधिन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. सांस्कृतिक कार्यक्रमास बंदिस्त सभागृहाच्या बैठक क्षमतेच्या ५० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत, लग्नसमारंभास जास्तीत जास्त ५० व्यक्ती, अंत्ययात्रा / अत्यंविधी कार्यास जास्तीत जास्त २० व्यक्तींना एकत्र येण्यास परवानगी देणेत आलेली आहे. तथापी सद्यस्थित ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येत असलेचे तसेच मानक कार्यप्रणाली / मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन होत नसलेचे निदर्शनास येत आहे. तरी बंदिस्त सभागृहे, मोकळ्या जागेत आयोजित करणेत येणाऱ्या सांस्कृतीक कार्यक्रम / लग्नसमारंभ यांचे आयोजक त्याचप्रमाणे संबंधीत आस्थापना यांचेकडून मानक कार्यप्रणाली / मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन केले जात असलेबाबतची तपासणी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी करुन उल्लंघन करणाऱ्या आयोजक / आस्थापना यांचेवर दंडात्मक कारवाई व आवश्यकते प्रमाणे आस्थापना बंद करणे इ. कार्यवाही करणेत यावी. मुख्याधिकारी किंवा त्यांचे प्रतिनीधी, स्थानिक प्राधिकारण व पोलीस विभागामार्फत अशा आस्थापनांना लेखी नोटीस द्यावी व अटींचे पालन करणेविषयी निर्देशीत करावे. त्याच प्रमाणे अटींचे उल्लंघन झाल्यास अशा आस्थापनांचे प्रमुख / व्यवस्थापका विरुध्द दंडनिय व फौजदारी कारवाई करणेत येईल अशी समज द्यावी.

२) स्थानिक आठवडी बाजार (जनावरांच्या बाजारासह) सुरू राहणेस परवानगी देणेत आलेली आहे. सदर आठवडी बाजाराबाबत स्थानिक ग्रामिण व नागरी प्रशासन कोव्हीड -१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने योग्यत्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेबाबत व कोविड-१९ बाबतचा शिष्टाचार काटेकोर पणे पाळणेबाबत आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. सदर निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जात असलेबाबतची खातरजमा संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी करुन उल्लंघन करणाऱ्या आयोजक / आस्थापना यांचेवर दंडात्मक कारवाई करणेत यावी.

३) प्रतिबंधीत क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्रातील धार्मिक स्थाने / प्रार्थना स्थळे सुरु करणेस अटी व शर्तीवर परवानगी देणेत आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यास सांस्कृतिक पार्श्वभूमी असून जिल्ह्यांतील ग्रामिण भागांमध्ये गाव / पंचायत पातळीवर अनेक यात्रा व उत्सवांचे आयोजन करणेत येते. तथापी कोविड -१९ च्या प्रार्दुभावाच्या अनुषंगाने यात्रा, उत्सव, उरुस इ. चे आयोजन करणेस बंदी असेल. परंतू अशा ठिकाणी पारंपारीक पध्दतीने धार्मिक विधी करणेस कमीत कमी मानकरी / पुजारी व भाविक यांचे उपस्थतीत पुजा करणेस परवानगी असेल. याबाबत संबंधीत स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी कोणतेही यात्रा, उत्सव, उरुस इ. पुढील आदेश होई पर्यंत होणार नाहीत याची कटाक्षाने दक्षता घेणेची आहे. ज्या ज्या ठिकाणी उल्लंघन आढळेल त्या त्या ठिकाणी स्थानिक प्राधिकारणाचे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी कारवाई करावी

Scanned by CamScanner

४) राजकीय सभा, मोर्चे, मिरवणूका, संमेलने या सारख्या मोठ्या प्रमाणावर गर्दी होणाऱ्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांना कोणत्याही परिस्थितीत आयोजन करणेस बंदी असेल. परंतू असे आयोजन बंदीस्थ जागेत असल्यास तेथील क्षमतेच्या ५० टक्के प्रवेश क्षमता व निर्जंतुकीकरण, सामाजिक अंतर इ. अटीस अधिन राहून तसेच मोकळ्या जागेतील कार्यक्रमासाठी ६-६ फुटांवर खुणा करुन त्यानुसार बसण्याची किंवा उभे राहण्याची व्यवस्था करावी. त्यानुसार प्रेक्षक बसतील किंवा उभे राहतील याची संयोजकांनी दक्षता घ्यावी. सादरीकरण करणाऱ्या या कलाकारांपासून प्रेक्षक कमीत कमी 6 फूट अंतरावर असावेत इ. अटीस अधिन राहून त्या त्या कार्यक्षेत्रातील सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधीत पोलीस निरीक्षक व स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेतले खेरीज आयोजित करण्यात येवू नयेत.

५) शाळा, कॉलेजीस, कोचींग क्लासेसच्या ठिकाणी मास्क तसेच विद्यार्थ्यांमध्ये सोशल डिस्टन्स ठेवणे यांची जबाबदारी संबंधित शाळा, कॉलेजीस, कोचींग क्लासेसचे प्रमुखांनी घ्यावयाची आहे. या अटीचे पालन न झाल्यास संबंधीत संस्था प्रमुख / व्यवस्थापक दंडनिय व फौजदारी कारवाईस पात्र राहतील. अशा संस्थामध्ये सर्व अटींचे पालन होते किंवा कसे याची तपासणी करणेसाठी व उल्लंघनाचे ठिकाणी त्या त्या संस्था प्रमुखांवर / व्यवस्थापकावर कारवाई करणेसाठी स्थानिक प्राधिकरणाने पथके नेमावित व वारंवार तपासणी करावी. अटींचे उल्लंघन करणाऱ्या संस्थेच्या प्रमुखांवर / व्यवस्थापकावर दंडनिय व फौजदारी कारवाई करणेसाठी संबंधीत मुख्याधिकारी किंवा त्यांचे प्रतिनीधी, संबंधीत स्थानिक प्राधिकारण व त्या त्या कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

६) जिल्ह्यातील हॉटेल / बार / रेस्टॉरंट यांना मार्गदर्शक सुचना, अटी व शर्ती घालून आस्थापनेच्या क्षमतेच्या ५०% क्षमतेसह सुरु करणेस परवानगी देणेत आलेली आहे. मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन हॉटेल / बार / रेस्टॉरंट सुरु करणेचे आहेत. सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही स्वरुपात कोविड-१९ चा प्रसार होणार नाही याची दक्षता घेणेची आहे. ज्या हॉटेल / बार / रेस्टॉरंट मध्ये शासनाने घालून दिलेल्या नियमावलीचे पालन होत नसेल व कोविड-१९ संसर्ग वाढण्यास मदत होत असेल अशा आस्थापना विरुध्द दंडात्मक कारवाई करणेचे अधिकार आवश्यकता पडलेस त्यांचा परवाना निलंबित करणेचेसुध्दा अधिकार संबंधीत सक्षम अधिकारी यांना देणेत आलेले आहेत. तरी जिल्ह्यातील हॉटेल / बार / रेस्टॉरंट यांचेकडून शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन होत असलेबाबतची खात्री यापूर्वी अधिकार प्रदान करणेत आलेल्या कार्यालयाकडून तसेच परवाना अधिकारी यांचेकडून करणेत यावी. स्थानिक प्राधिकरण व पोलीस विभागामार्फत त्यांचे त्यांचे कार्यक्षेत्रात अशा सर्व आस्थापनांना अटी व कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक मानके याबाबत लेखी नोटीस द्यावी व उल्लंघन झाल्यास अशा आस्थापनां विरुध्द दंडनिय व फौजदारी कारवाई करणेत येईल याची समज देणेत यावी. वारंवार उल्लंघन होत आहे असे निदर्शनास आल्यास टप्प्या टप्प्याने दंडनीय व फौजदारी कारवाई करावी.

७) कोल्हापूर जिल्ह्यातील प्रतिबंधीत क्षेत्राबाहेरील पर्यटन स्थळे, सर्व ऐतिहासिक वास्तू, दुर्ग, स्मारके, संग्रहालये इ. साठी कोविड-१९ संदर्भातील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणेच्या अटी व शर्तीसह पर्यटक / नागरिकांसाठी खुले करणेस परवानगी देणेत आलेली आहे. सदर ठिकाणी मास्क नाही तर प्रवेश नाही व आवश्यक सामाजिक अंतर बाळगणे, हात निर्जंतुकीकरण करणे बंधन कारक आहे. याची कडक अंमलबजावणी त्या त्या स्थानिक प्राधिकरण व पोलीस प्रशासनाने करणेची आहे.

८) स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सार्वजनिक ठिकाणी जसे सार्वजनिक शौचालय, बस स्टँड, रेल्वे स्टेशन व इतर सार्वजनिक ठिकाणे निर्जंतुकीकरण साधनांचा वापर करुन वारंवार निर्जंतुकीकरण व स्वच्छता करण्यात यावी.

९) सर्व खाजगी व्यापारी आस्थापनांनी, शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी दर्शनी भागावर मास्क नाही, प्रवेश नाही, मास्क नाही वस्तु / सेवा वितरण नाही इ. फलक लावावेत व त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. मुख्याधिकारी, स्थानिक प्राधिकरणे व पोलीस विभागा मार्फत या निर्देशांचे पालन करणे कामी मोठ्या प्रमाणावर तपासणी मोहिम हाती घ्यावी व उल्लंघन करणाऱ्या आस्थापनां विरुध्द प्रथम दंडनिय व त्यानंतर पुन्हा पुन्हा घडणाऱ्या उल्लंघनासाठी फौजदारी कारवाई करावी.

१०) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, दुचाकी, ऑटो रिक्षा, खाजगी प्रवासी बसेस यामधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी सक्तीने मास्कचा वापर करणे बंधनकारक करणेत येत आहे. संबंधीत सक्षम प्राधिकारी व पोलीस विभागामार्फत याच्या अंमलबजावणीसाठी धडक मोहिम राबवावी. अटीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व व्यवस्थापकाविरुध्द दंडनिय कारवाई करावी.

११) सर्व खाजगी डॉक्टर यांनी त्यांचेकडे तपासणीसाठी आलेल्या सर्दी, खोकला व तापाची लक्षणे असलेल्या रुग्णांना कोविडची तपासणी करणे अनिवार्य करावे. तपासणीमध्ये पॉझिटीव्ह आढळून आलेल्या रुग्णांना अलगीकरण करणे बंधनकारक करावे.

१२) महानगरपालिका, नगरपालिका त्याच प्रमाणे ग्रामिण भागासाठी त्या त्या सक्षम आरोग्य यंत्रणेद्वारे एका सकारात्मक चाचणी प्राप्त रुग्णाकरिता त्याच्या संपर्कातील किमान २० व्यक्तींची कोव्हिड टेस्ट (रॅपिड अँटीजेन / आरटीपीसीआर) करण्यात यावी. पॉझिटिव्ह रुग्ण येणारा भाग /एरिया/ प्रभाग यांचा शोध घेवून प्रतिबंधीत क्षेत्र (कंटेनमेंट झोन) घोषित करावा. संबंधीत ठिकाणी निर्जतूकीकरण करावे जेणेकरुन संसर्गाचा प्रसार रोखणे सोपे होईल.

Scanned by CamScanner

१३) नागरी व ग्रामिण शासकीय / निमशासकीय आरोग्य यंत्रणेद्वारे मोठ्या प्रमाणावर ILI व SARI चे रुग्ण शोधणे त्याच प्रमाणे कोविड ची लक्षणे असलेले रुग्ण शोधण्याची त्यांची कोविड चाचणी करणेसाठी आरोग्य पथके नेमावीत व अशा रुग्णांचे अलगिकरण करण्याची कार्यवाही करावी.

१४) नागरी व ग्रामीण क्षेत्रातील आरोग्य यंत्रणेने वाढती रुग्ण संख्या विचारात घेवून संबंधित आवश्यक कोविड केअर सेंटर, कोविड हॉस्पिटल, कोविड केअर हॉस्पिटलमध्ये पुरेशा खाटा उपलब्ध राहतील, सर्व उपकरणे सुस्थितीत असतील (व्हेंटीलेटर्स / ऑक्सीजन पुरवठा यंत्रणा) याची खातरजमा करावी. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे.

१५) वेगाने प्रसार करणाऱ्या (सुपर स्पेडर) संवर्गातील व्यक्तींची वारंवार तपासणी करुन सकारात्मक चाचणी आल्यास अलगिकरण कक्षात ठेवावे.

सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी आस्थापना तसेच सर्व नागरिकांनी उपरोक्त नमुद केलेल्या सर्व उपाय योजना त्याच प्रमाणे शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करणेत आलेल्या मार्गदर्शक सुचनांची अमलबजावणी काटेकोर पणे करुन कोरोना संसर्गाचा प्रार्दुभाव वाढणार नाही याची खबरदारी घ्यावी.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहीता १८६० (४५) च्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(दौलत देसाई)

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर**

प्रत :- १. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
४. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर
५. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर
६. सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, कोल्हापूर
७. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
८. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
९. गट विकास अधिकारी (सर्व)
१०. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत.
११. सर्व ग्रामपंचायती.
१२. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे उपरोक्त आदेश जनतेच्या माहितीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल इकडे द्यावा.
१३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

Scanned by CamScanner